संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

चैतन्याचे चिंतन मनभावन श्रावण!

सृष्टीच्या सौंदर्याचे साहित्य किंवा वाङमयातून केले जाणारे वर्णन नेहमीच मनाला भुरळ घालत असते. ज्या सृष्टीच्या ऋतुचक्रामध्ये अबालवृद्धांपासून सगळ्यांनाच मोहीत करण्याची किमया वर्षाऋतू करत असतो. इतर दोन ऋतूंपेक्षाही वर्षाऋतूचीच सगळेजण आतुरतेने वाट पाहत असतात. कालचक्राप्रमाणे वर्षाऋतुतल्या पर्जन्यधारा म्हणजे सगळ्याच जीवसृष्टीला मिळणारे जीवदान असते. कारण अन्नधान्यापासून ते पिण्याच्या पाण्याची वर्षभराची तरतूद वर्षाऋतूमध्ये होत असते. जवळपास चार महिने कोसळणाऱ्या या पर्जन्यधारा धरतीलाही नवं रूप बहाल करतं. स्वाभाविकपणे मानसिक पातळीवर व्यक्ती आणि समाजालादेखील एका उत्साही आणि उल्हासमयी वातावरणाचा अनुभव घेता येतो. प्रामुख्याने नवनिर्मिती किंवा सृजनाचे अनेक प्रकारचे विभ्रम वर्षाऋतूचे वैशिष्ट्य असते. उन्हाळ्यात कोरड्याठाक पडलेल्या नद्या तुडुंब पाण्याने खळखळू लागतात. डोंगरदऱ्यांमधले झरे, धबधबे याच वर्षाऋतूच्या आनंदात बागडत आहेत असे वाटू लागते. शेतांमधून येणारं अन्नधान्याचं मोत्यासारखं पीक, माळरानावर पसरलेला गवतांचा हिरवागार शालू असे एक ना अनेक प्रकारे या वर्षाऋतूचं नवनिर्मितीचं वरदान प्राप्त होत असते. साहित्यातून, वाङमयातून किंवा कवितांतून, गाण्यांमधून व्यक्त होणाऱ्या भावना केवळ सृष्टीचं वर्णन करून थांबत नाहीत. तर जीवन जगण्याचा आत्मविश्वासच देत असतात. वर्षाऋतू हे सृजन किती सहजपणे बहाल करतो याची अनुभूतीच त्यातून व्यक्त होत असते. या सगळ्या ऋतूंमध्ये वर्षाऋतु जसा महत्त्वाचा तसा या वर्षाऋतूमध्ये श्रावण महिना अधिक आकर्षक, मोहक, आणि तितकाच भक्तीपूर्ण वाटत आलेला आहे. प्राचीन काळापासून अगदी रामायणातसुद्धा वर्षाऋतूचे आणि श्रावण महिन्याचे वर्णन वाचायला मिळते. आषाढातला गडगडाटासह येणारा पाऊस, श्रावणामध्ये मंद आणि हलक्या सरींनी बरसत असतो. आणि या श्रावणसरी जणूकाही धरतीशी हितगुज तर करतातच. परंतु त्यातून निर्माण होणारा नाद, अंतर्मनालाही ऐकू येतो. त्याचं तन्मयतेने केलेले श्रवण म्हणजेच श्रावणाचे खरे आकर्षण असते. श्रावणात प्रत्येक व्यक्तीच्या संवेदनांना अंकुर फुटतो. आणि हाच रिमझिम बरसणारा पाऊस अंगावर घेऊन अंतर्मनात निनादणारा हर्ष अनुभवण्याची प्रत्येकाला प्रेरणा मिळते.

श्रावण सृष्टीचे वंदन

अधिक व्यापक अर्थाने विचार केला तर श्रावणमयी सृष्टीला केलेलं वंदन, श्रावण विनम्रतेचं निदर्शक ठरणारं अभिवादन आणि श्रावण म्हणजे सृष्टीशीच हितगुज करणारं अवखळ असं मनही म्हणता येतं. या महिन्यात येणारे सणवार, व्रतवैकल्य, म्हणजे श्रावणसरींचा होणारा अभिषेक आणि त्यानंतरचे पूजापाठ आणि मंत्रघोषांचे ऐकू येणारे स्वर म्हणजेच एक मंद दरवळणारा सुगंध असतो. सृष्टी श्रावणातल्या त्या घननिळाने अधिक खुलून जाते. तिच्याकडून दिलं जाणारं आनंदाचं वरदान म्हणजे जणूकाही मनुष्याच्या चित्ताला अवघ्या चैतन्याने केलेलं आवाहन ठरतं. हा श्रावण जितक्या मनस्वीपणाने अनुभवावा, तेवढा तो प्रत्येकाला आपल्यामध्ये सामावून घेतो अनेक प्रकारचे दुःख नैराश्य विसरायला लावून नव्या आत्मविश्वासाचं दानही देतो. काहीवेळेला तर भक्ती, श्रद्धा निष्ठा यांचा विचार करत असताना श्रावण म्हणजे सृष्टीचे चैतन्य आणि अध्यात्मच म्हणावं लागतं. जिथे खऱ्या अर्थाने सृष्टीचं समाधान आणि शांत मनाचा अनुभव घेता येतो. कदाचित म्हणूनच बालकवींना त्या अजरामर ओळी सुचल्या असाव्यात. बालकवींनी आपल्या अनुभूतीतूनच या ओळी लिहील्या असाव्यात.

श्रावणमासी, हर्षमानसी, हिरवळ दाटे चोहीकडे।

हे केवळ निसर्ग वर्णन नाही. तर मानवी मनाने सृष्टीच्या सौंदर्याचे केलेले अत्तरयुक्त शिंपण आहे. प्रसिद्ध कवयित्री इंदिरा संतसुद्धा म्हणतात ,

बांधले सोडले, हिंदोळे हर्षाचे।
हासले रुसले मयुर मनाचे।
श्रावण कोणाचे, मनस्वी हे क्षण?
निसर्गचित्रात पावले स्पंदन।

कुसुमाग्रजांनीसुद्धा श्रावण म्हणजे केशराचं शिंपण करणारा विलक्षण क्षण असल्याचे म्हटले आहे. ते म्हणतात,

लपत छपत हिरव्या रानात।
केशर शिंपीत श्रावण आला।
इंद्रधनूच्या बांधित कमानी।
संध्येच्या गगनी श्रावण आला।

इतक्या उदारपणे आणि कृतज्ञतेने या एकाच महिन्याचे गोड कौतुक होते. याचा अर्थ सृष्टीच्या सौंदर्याचे गुपितच जणू श्रावण स्वतःमध्ये सामावून घेत असतो. ते गुपित वेगवेगळ्या पद्धतीने शब्द आणि भावभावनांच्या माध्यमातून उलगडण्याचा प्रयत्न साहित्य आणि वाङमयातून कवितांतून होत आला आहे.

हे सृष्टीचे अध्यात्मच

एकीकडे या महिन्यात निसर्गाचंही अध्यात्म व्यक्त होत राहतं. तर दुसरीकडे सामाजिक स्तरावर सणवारांच्या सांस्कृतिक अभिसरणाने समाजमनाचेही मंथन होतं. श्रावण सोमवार, मंगळागौर, दहिहंडी, रक्षाबंधन, नागपंचमी, या सणवारांनी पुन्हा एकदा सामाजिक आणि नातेसंबंधांची शक्य तेवढी गुंफण होत राहते. या महिन्यात केले जाणारे उपासतापास हा व्रतवैकल्याचा जरी भाग असला तरी या महिन्यातले वातावरण आहारावरही नकळतपणे नियंत्रण आणणारे असते. म्हणजे सण आणि मन यांचा एक अनन्य संबंध प्रामुख्याने श्रावणातच ठळकपणे पाहायला मिळतो. ज्या मनाचा आणि चैतन्याचा अध्यात्मातून नेहमीच संबंध लावला जातो तो कृतीशीलपणे अनुभवण्याची संधी श्रावणातले सण आणि सृजन उपलब्ध करून देतात. अशा अर्थाने हे मनमांगल्याचं तोरण अगदी सहजपणे उभं राहातं. बालकवींनी तो इंद्रधनुष्य पाहूनच केलेले हे वर्णन श्रावणाचं आनंदी घननिळ रूपच साकार करतं. ते म्हणतात,

वरती बघता इंद्रधनुचा गोफ दुहेरी विणलासे।
मंगल तोरण काय बांधिले नभोमंडपी कुणी भासे।

श्रावणातले हे सगळे क्षणाक्षणाला बदलणारे रूप म्हणजे मनात गुणगुणणारं एक सुंदर गाणं आणि या महिन्यात घडणाऱ्या अनेक घटना किंवा सृष्टीत घडून येणारी हलचल श्रावणाचे मनमुराद वाचन करायला लावते. आणि तो हर्ष किंवा आनंद जितका साठवावा तितका कमी पडत राहतो.

देव दर्शना निघती ललना। हर्ष मायिना हृदयात।
वदनी त्यांच्या वाचून घ्यावे श्रावण महिन्याचे गीत।

असा खऱ्या अर्थाने गुणगुणायला लावणारा आणि मनामनाचे वाचन करवून घेणारा हा मनभावन श्रावण ठरतो.

सुविचार

विलास कोळेकर
मालेवाडी, जि. सांगली. मोबा.९४२२४२०६११

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात,
डोक्यावर सोन्याचा मुकूट असण्यापेक्षा
डोक्यात ज्ञानाचा प्रकाश असणे कधीही श्रेष्ठ.

पंचांग

शुक्रवार, १४ ऑगस्ट २०२६
शक १९४८ पराभवनामसंवत्सर
श्रावण शुक्ल द्वितीया
नक्षत्र : पूर्वा फाल्गुनी

रवी उदय- ०६-२१
रवी अस्त- १९-०६

-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० सिंह

पारसी पतेती, जरा जिवंतिका पूजन, श्री महालक्ष्मी स्थापना व पूजन, नूतन चंद्रदर्शन

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

फॉर्म ए
जाहीर घोषणा
(इन्सॉल्व्हन्सी अँण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (कॉर्पोरेट व्यक्तिंकरिता दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) विनियमन, २०१६ चे विनियमन ६ अन्वये)

सायबरकॉर्प लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता

संबंधित तपशिल

१	कॉर्पोरेट ऋणकोचे नाव	सायबरकॉर्प लिमिटेड
२	कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना तारीख	१३ ऑक्टोबर २०२२
३	ज्या प्राधिकरणाअंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले आहे	कंपनी निबंधक - कोलकाता १
४	कॉर्पोरेट ऋणकोचे कॉर्पोरेट ओळख क्र./ मर्यादित दायित्व ओळख क्र.	U72900WB2022PLC257150
५	कॉर्पोरेट ऋणकोचे नोंदणीकृत कार्यालय व प्रधान कार्यालयाचा (काही असल्यास) पत्ता	**नोंदणीकृत कार्यालय:** ३सी कॅमॅक स्ट्रीट, कोलकाता, पश्चिम बंगाल, भारत - ७०००१६ **मुख्य कार्यालये:** **१. कोलकाता -** करीवाला टॉवर, तिसरा मजला, जे१-५, ईपी ब्लॉक, सेक्टर ५, सॉल्ट लेक, कोलकाता, पश्चिम बंगाल - ७०००९१. **२. मुंबई -** ९०७-९१०, मेहोक, सहार प्लाझा, अंधेरी-कुर्ला रोड, जेबी नगर, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००५९. **३. नवी दिल्ली -** जी-१बी, पहिला मजला, धवन दीप बिल्डिंग, ६, जंतर मंतर रोड, नवी दिल्ली - ११०००१
६.	कॉर्पोरेट ऋणकोच्या संदर्भात दिवाळखोरी सुरू होण्याची तारीख	११ ऑगस्ट २०२६
७.	दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया बंद होण्याची अंदाजित तारीख	७ फेब्रुवारी २०२७
८.	अंतरिम उदाव व्यावसायिक म्हणून कार्यरत दिवाळखोर व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक	सीए. अतुल रावबाडकर **नोंदणी क्र.** IBBI/IPA-001/IP-P00152/2017-18/10321
९.	बोर्डाकडे नोंदणीकृत अंतरिम उदाव व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल	**नोंदणीकृत पत्ता:** ४७, हिंदुस्थान कॉलनी, वर्धा रोड, नागपूर, महाराष्ट्र, ४४००१५ **ईमेल:** vervecapital@gmail.com
१०.	अंतरिम उदाव व्यावसायिकांशी पत्रव्यवहार करण्यासाठी पत्ता आणि ई-मेल वापरला जाईल	**नोंदणीकृत पत्ता:** ४७, हिंदुस्थान कॉलनी, वर्धा रोड, नागपूर, महाराष्ट्र, ४४००१५ **ईमेल:** cybercorp.insolvency@gmail.com
११.	दावा सादर करण्याची अंतिम तारीख	२५ ऑगस्ट २०२६
१२.	कलम २१ च्या उपकलम (६अ) च्या खंड (ब) अंतर्गत, जर असेल तर, अंतरिम उदाव व्यावसायिकाद्वारे निश्चित केलेले धनकोंचे वर्ग	वर्गांचे नावः **लागू नाही**
१३.	वर्गातील कर्जदारांचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी ओळखल्या गेलेल्या दिवाळखोर व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गासाठी तीन नावे)	**लागू नाही**
१४.	(अ) संबंधित फॉर्म आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचे तपशील येथे उपलब्ध आहेत:	वेबसाईट: https://ibbi.gov.in/home/downloads वास्तविक पत्ता: लागू नाही

वाढाद्वे सूचना देण्यात येत आहे की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने दिनांक **११ ऑगस्ट २०२६** रोजी **सायबरकॉर्प लिमिटेड**च्या कॉर्पोरेट दिवाळखोरी निराकरण प्रक्रियेला सुरुवात करण्याचा आदेश दिला आहे.
सायबरकॉर्प लिमिटेडच्या धनकोंना येथे आवाहन करण्यात येते की त्यांनी त्यांचे दावे पुराव्यांसह **२५ ऑगस्ट २०२६** रोजी किंवा त्यापूर्वी बाब क्र. १० विरुद्ध नमूद केलेल्या पत्त्यावर अंतरिम रिझोल्यूशन प्रोफेशनलकडे सादर करावेत.
वित्तीय धनकोंनी त्यांचे दावे पुराव्यासह इलेक्ट्रॉनिक माध्यमातूनच सादर करावेत. इतर सर्व धनको पुराव्यासह वैयक्तिकरित्या, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे सादर करू शकतात.
बाब क्र. १२ समोर सूचीबद्ध केलेल्या वर्गातील वित्तीय धनकोंने, फॉर्म सीए मध्ये, बाब क्र. १३ समोर सूचीबद्ध केलेल्या तीन दिवाळखोरी व्यावसायिकांपैकी, त्या वर्गाचा (वर्ग निर्दिष्ट करा) अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी आपल्या पसंतीच्या अधिकृत प्रतिनिधीची निवड दर्शवावी.
दाव्याचे खोटे किंवा दिशाभूल करणारे पुरावे सादर केल्यास दंड आकारला जाईल.

सही/-
सीए अतुल रावबाडकर
सायबरकॉर्प लिमिटेडच्या प्रकरणातील आयआरपी
प्रक्रिया ईमेल: cybercorp.insolvency@gmail.com
नोंदणीकृत ईमेल: vervecapital@gmail.com
नोंदणीकृत पत्ता: ४७, हिंदुस्थान कॉलनी, वर्धा रोड, नागपूर, महाराष्ट्र, ४४००१५
नोंदणी क्र.: IBBI/IPA-001/IP-P00152/2017-18/10321
एएफए क्र.: एए१/१०३२१/०२/३११२२६/१०८४२२ (वैधता ३१.१२.२०२६ पर्यंत)

दिनांक: १४.०८.२०२६
ठिकाण: नागपूर



ठाणे स्मार्ट सिटी मॅरेथॉन २३ ऑगस्टला

■ ठाणे

लोक आश्रमचे संस्थापक डॉ. अभिषेक राणे यांच्या तर्फे ठाणे जिल्हा हौशी ॲथलेटिक्स संघटनेच्या मान्यतेने रविवारी २३ ऑगस्ट रोजी ठाणे जिल्हास्तरीय ठाणे स्मार्ट सिटी मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. ठाणे पूर्व भागातील अष्टविनायक चौकातून सुरू आणि शेवट होणाऱ्या या दौडमध्ये पुरुष - महिला गट १० किलोमीटर, १८ वर्षे वयोगट मुले - मुली गट ७ किलोमीटर, १५ वर्षे मुले - मुली गट ५ किलोमीटर, १२ वर्षे वयोगट मुले - मुली ३ किलोमीटर अंतराची शर्यती होतील. प्रत्येक शर्यतीतील पहिल्या दहा क्रमांकाच्या विजेत्यांना रोख बक्षिसांनी गौरवण्यात येईल.

शरीरसौष्ठवाला नवी ताकद! खेळाडूंच्या न्यायासाठी ५ संघटना एकवटल्या

■ मुंबई

अनेक वर्षे फुटीच्या विळख्यात अडकलेल्या मुंबईच्या शरीरसौष्ठवाला अखेर एकीचे दमदार बळ मिळाले. विखुरलेली ताकद, तुकड्यांत विभागलेली संघटना आणि त्यामुळे मागे पडलेले खेळाडू या सर्वांना आता एकजुटीची ताकद मिळाली. शरीरसौष्ठव खेळाचे आधारस्तंभ आणि माजी खासदार गजानन कीर्तीकर यांच्या पुढाकाराने मुंबईतील ५ प्रमुख शरीरसौष्ठव संघटना एका ध्येयाखाली एकत्र आल्या असून, आता राज्य, राष्ट्रीय आणि जागतिक स्तरावर मुंबईचा झेंडा पुन्हा दिमाखात फडकवण्याचा निर्धार करण्यात आला आहे.

भारतीय शरीरसौष्ठवात मुंबईला नेहमीच 'पंढरी' मानले जाते. देशातील सर्वाधिक दर्जेदार शरीरसौष्ठवपटू घडवणारी ही माती गेली अनेक वर्षे संघटनात्मक फुटीमुळे कमकुवत होत होती. एकेकाळी राष्ट्रीय स्पर्धांवर वर्चस्व गाजवणारे मुंबईचे खेळाडू निवड प्रक्रियेतील गोंधळ, संघटनांतील संघर्ष आणि अंतर्गत मतभेदांमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर मागे पडत होते. परिणामी, जागतिक दर्जाच्या अनेक खेळाडूंना सन्मान, पुरस्कार आणि संधींपासूनही वंचित राहावे लागत होते.

PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public at large that, my client **MR. SURESH PUTHRAN** has purchased a flat Vide Flat No. 201, 2nd floor bldg No. S. P- 97, Poonam Complex, 96-97, CHS LTD., Shanti Park, Mira Road (East), Thane - 401107. The original owner have handed over the chain agreement to the purchaser, whereas the first agreement for sale dated 31-12-2001 was subsequently registered through Deed of Confirmation Dated 23-01-2003 vide document No. **TNN 2-452/2003.** That the **page No. 1 to 7** of the Deed of Confirmation dated **23-01-2003** is missing from the original set of Agreement for sale, which is not traceable till date. Any person having any right, title or interest in the aforesaid Deed of Confirmation in respect of the Agreement or having any objection in respect of the Agreement for Sale, may contact the undersigned with the relevant documents **within 14 days** from the date of publication of this paper notice, failing which no person will entertain in respect of any claim and no subsequent object or claim whatsoever shall be entertained.

Sd/-
ADVOCATE ARUN KUMAR DUBEY
Flat No. 002, D-66, Sector No. 10
Shanti Nagar, Mira Road (East),
Thane - 401107. Mobile No. 9833285351

SBI-SG
One Stop Solution For All Investments
SBI-SG GLOBAL SECURITIES SERVICES PVT. LTD.
B-Wing, Ground Floor, Jeevan Seva Annex (LIC) Building,
SVP Road, Santacruz (W), Mumbai – 400054, Maharashtra, India

TENDER NOTICE

Chief Administrator & Financial officer, SBI-SG Global Securities Services Pvt Ltd, B Wing, Ground Floor, Jeevan Seva Annex (LIC) building, SVP Road, Santacruz – W, Mumbai – 400054, Maharashtra, India invites sealed bids from eligible bidders (Eligibility, Technical Bid and Commercial Bid) for Hiring of Office Premises admeasuring carpet area of 18500 sqft +/- 15% on Leave & License Basis between Dadar & Mahalaxmi, Mumbai as per requirement mentioned in RFP number **RFP / SBISG GSS /26-27 /011 DATED 13-08-2026.** The Premises shall be in a building approved for Commercial and/or IT/ITES use. The complete set of bidding documents along with schedule of events can be downloaded from our website **https://www.sbisgcsl.co.in/statutory/ "TENDER"** section. Complete set of bidding documents may be submitted in sealed envelopes on or before 4th September 2026 by 3.00 pm at our registered office.

Sd/-
(Amitav Kar)
Chief Financial Officer

SBI
भारतीय स्टेट बँक
प्रादेशिक व्यावसायिक कार्यालय, ठाणे पश्चिम
जोएल स्मृती, मांडली तलावासमोर, फाटक रोड, भाईंदर पश्चिम – 401101

व्यावसायिक / कार्यालयीन वास्तूची आवश्यकता

भारतीय स्टेट बँक, नायगाव पूर्व शाखा, ठाणे जिल्हा येथे सुमारे 1500 चौ.फू. +/- 10% चटई क्षेत्रफळ, शक्यतो तळमजल्यावर आणि पुरेशी पार्किंगची सोय असलेल्या असलेल्या व्यावसायिक / कार्यालयीन वास्तूचे प्रस्ताव बँकेकरिता भाडेपट्टा तत्त्वावर मागवित आहे. अधिक तपशिलांसाठी आणि नायगाव पूर्व शाखा, ठाणे जिल्हा येथील निविदा पत्रिका डाऊनलोड करण्यासाठी, कृपया **14.08.2026** ते **03.09.2026** दरम्यान एसबीआय वेबसाईटला **https://sbi.co.in/web/sbi-in-the news/procurement-news** येथे भेट द्या.
या कार्यालयात प्रस्ताव सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ **03.09.2026** रोजी **दुपारी 3:00** पर्यंत असेल. बँकेला कोणतेही कारण न देता कोणताही किंवा सर्व अर्ज स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार आहे.
या संदर्भातील पुढील शुद्धिपत्रिका जर असेल तर, केवळ बँकेच्या वेबसाईटवरच प्रकाशित होईल.

कृपया मध्यस्थांनी अर्ज करू नये.
दिनांक : 14.08.2026
सहायक महाव्यवस्थापक
आरबीओ-2 ठाणे वेस्टर्न

पुणे महानगरपालिका
पाणीपुरवठा विभाग
टेंडर सेल
''फेर निविदा''

पुणे महानगरपालिकेच्या खाली नमूद केलेल्या विभागाकडील कामाचे फेर निविदा देण्यात येत आहे. सदर कामाबाबतच्या निविदा अटी शर्ती इत्यादी बाबतचा सर्व तपशील निविदा संचमध्ये नमूद केलेला आहे व निविदा संच ऑनलाईनवर निशुल्क पहावयास उपलब्ध आहे.

टेंडर विक्री कालावधी - दिनांक १४/०८/२०२६ ते २१/०८/२०२६ दुपारी २.३० पर्यंत
टेंडर स्वीकृती कालावधी- दिनांक १४/०८/२०२६ ते २१/०८/२०२६ दुपारी २.३० पर्यंत
टेंडर उघडणे कालावधी - दिनांक २४/०८/२०२६ दुपारी १०.०० पर्यंत

अ. क्र.	खात्याचे नाव	टेंडर क्रमांक
१.	पाणी पुरवठा विभाग	PMC/ WATER_SUPPLY/2026/175

१) वरील टेंडर्सची विक्री व स्वीकृती https:mahatenders.gov.in/nicgep/app या संकेतस्थळावर फक्त ऑनलाईन चालू आहे.
२) बाकी सर्व मजकूर पूर्वी प्रसिद्ध केल्याप्रमाणे कायम राहील .

सही/-
कार्यकारी अभियंता (विद्युत)
पाणीपुरवठा विभाग
पुणे महानगरपलिका

जाहिरात क्र. २/५७२ दि. १३/०८/२०२६

नाशिक महानगरपालिका, नाशिक
मध्यवर्ती ई-निविदा कक्ष विभाग
जाहिर ई - निविदा सुचना क्र. ३१ निविदा (सन २०२६-२७)

नाशिक महानगरपालिका, नाशिक **सार्वजनिक बांधकाम विभागाकडील (सिहंस्थ कामे) - २ या** कामाची जाहिर ई-निविदा सुचना क्रमांक ३१ (सन २०२६-२७) दिनांक १४/०८/२०२६ पासुन दिनांक २४/०८/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपावेतो मा. शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिसेल. निविदा स्विकृतीची अंतिम दिनांक २४/०८/२०२६ राहील.
टीप - यापुढील सर्व आवश्यक सुचना / शुध्दीपत्रक हे Online website वर प्रसिध्द करणेत येतील.

स्वाक्षरीत/ -
कार्यकारी अभियंता
ई-निविदा कक्ष प्रमुख
नाशिक महानगरपालिका, नाशिक

जनसंपर्क/जा.क्र./७२/२०२६
दि. १३/०८/२०२६
गोदा प्रदुषण टाळा, भविष्य संभाळा.

बृहन्मुंबई महानगरपालिका
(जल अभियंता विभाग) (ओ.सी.विभाग)
उप ज.अ.(एमॲण्डई) एमIIIए/२०४२/पी.पी. दि. १२ ऑगस्ट, २०२६

ई-निविदा सूचना

बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त खाली नमूद केलेल्या कामाकरिता त्या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांकडून बाब दर तत्त्वावर तीन पाकीट प्रणालीमध्ये ऑनलाईन निविदा मागवित आहेत.

विभाग	जल अभियंता
अनुभाग	उप जल अभियंता (एमॲण्डई) एम-३ ए पिसे-पांजरापूर.
महानिविदा बोली क्रमांक	१) २०२६_बृमुंमपा_१३२७५८८ २) २०२६_बृमुंमपा_१३२७५९७
कामाचे नाव	१. एम-III ए १०० केव्ही उप स्थानक, पांजरापूर येथे स्थापित मार्शलिंग बॉक्सेस बदलणे. २. एम-III ए उप स्थानक आणि पंपिंग स्टेशन पांजरापूर येथील विद्यमान प्रगत ईएसई लायटींग संरक्षण प्रणाली बदलण्यासह एम३ए पंपिंग स्टेशन पिसे येथील प्रगत ईएसई लायटींग संरक्षण प्रणाली पुरवून अर्थिंग प्रणालीचे नूतनीकरण.
वेबसाईट	https://mahatenders.gov.in

निविदा प्रपत्रे बृमुंमपाच्या वेबसाईट (https://mahatenders.gov.in) वरून "निविदा" विभागातून डाऊनलोड करता येतील.

सही/-
कार्यकारी अभियंता (एमॲण्डई)
एम-३ ए, पिसे पांजरापूर

पीआरओ/१०८२/जाही./२०२६-२७

थोडासाही ताप येता, डॉक्टरांना जाऊन भेटा

नवी मुंबई महानगरपालिका
शहर अभियंता विभाग
निविदा सुचना क्र.नमुंमपा/श.अ./91/2026-2027

कामाचे नाव :- घणसोली विभागातील विविध ठिकाणी चौकांचे कॉंक्रीटीकरणाने सुधारणा करणे .
अंदाजपत्रकिय रक्कम (रु.) :- 5,17,96,857/-

निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-Tendering) संगणक प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.14/08/2026 रोजी प्राप्त होतील. निविदेचे सादरीकरण https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online करण्याचे आहे. ई-निविदा ई-टेंडरिंग (E-Tendering) प्रकियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणीसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबरवर संपर्क करावे.
कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकरण्याचा अधिकार मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.

सही/-
(शिरीष आरदवाड)
शहर अभियंता
नवी मुंबई महानगरपालिका

जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/620/2026

ठाणे महानगरपालिका, ठाणे
सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिकेमार्फत राज्य सरोवर संवर्धन योजनेअंतर्गत खर्डी, शिळ, गोकुळनगर, तुर्फेपाडा (टप्पा -२) व दिवा या तलावांचे संवर्धन करणेच्या पाच स्वतंत्र कामांची ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदा प्रक्रियेमध्ये ज्या निविदाकारांवर शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक उपक्रम, स्थानिक संस्था, महानगरपालिका इत्यादीमार्फत नोंदणी रद्द करणेबाबत/ काळ्या यादीत टाकणेबाबत कार्यवाही करण्यात आली आहे अथवा प्रस्तावित आहे अशा निविदाकारांना निविदा भरता येणार नाही. सविस्तर निविदा सुचना व प्रपत्र संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथे दि. १७.०८.२०२६ ते दि. २४.०८.२०२६ पर्यंत सायंकाळी १६.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा संकेतस्थळ येथे दि.२४.०८.२०२६ रोजी सायंकाळी १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. सदरच्या निविदा शक्य झाल्यास दि.२५.०८.२०२६ रोजी सायंकाळी १६.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.
ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-मु/३८०/२०२६-२७ सही/-
दि:१३.०८.२०२६ नगरअभियंता
Pls visit our oficial web-site ठाणे महानगरपालिका, ठाणे
www.thanecity.gov.in
अनधिकृत बांधकामाला आळा घाला..
अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !

लान्सर कंटेनर लाईन्स लिमिटेड
सीआयएन - L74990MH2011PLC214448
नोंद. कार्यालय: मथुरेश चेंबर्स प्रिमायसेस को-ऑप. सोसायटी लि., युनिट क्र. एच०२-२, एच०२-३ आणि एच०२-४, प्लॉट क्र. ६०, सेक्टर-११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४.
दूरध्वनी क्र.: (+९१ २२) २७५६६९४०/४१/४२, **ई-मेल:** secretarial@lancerline.com, **वेबसाईट:** www.lancerline.com

दि. ३० जून, २०२६ रोजी संपलेल्या त्रैमासिकाकरिता
स्वतंत्र आणि एकत्रित अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षाचे विवरणपत्र

लान्सर कंटेनर लाईन्स लिमिटेड (**"कंपनी"**) याद्वारे सूचित करते की, दि. ३० जून, २०२६ रोजी संपलेल्या त्रैमासिकाचे स्वतंत्र व एकत्रित लेखापरीक्षित आर्थिक निष्कर्ष (**"निष्कर्ष"**) बुधवार, दि. १२ ऑगस्ट, २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या लेखा समिती आणि संचालक मंडळाच्या संबंधित बैठकांमध्ये, लेखा समितीद्वारे पुनरावलोकित करण्यात आले आणि संचालक मंडळाद्वारे त्यांना मंजुरी देण्यात आली आहे आणि कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षक प्रणिती यादव अँड कं., चार्टर्ड अकाउंटंट्स यांच्याद्वारे मर्यादित पुनरावलोकन करण्यात आले आहे.
सेबी (सूचिबद्धता दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियमन, २०१५, वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार, च्या विनियमन ३३ च्या तरतुदींनुसार, मर्यादित पुनरावलोकन अहवालासह निष्कर्षाचे संपूर्ण प्रारूप कंपनीची वेबसाईट *https://lancerline.com/* आणि बीएसई लिमिटेडच्या वेबसाईट *www.bseindia.com* वर उपलब्ध आहे. खाली दिलेले क्विक रिस्पॉन्स (**"क्यूआर"**) कोड स्कॅन करून देखील ते प्राप्त करता येतील.

कंपनीच्या वेबसाईटवर निष्कर्ष पाहण्याकरिता क्यूआर कोड स्कॅन करा
बीएसई लिमिटेडच्या वेबसाईटवर निष्कर्ष पाहण्याकरिता क्यूआर कोड स्कॅन करा

संचालक मंडळाकरिता आणि त्यांच्या वतीने
लान्सर कंटेनर लाईन्स लिमिटेड

दिनांक: १३ ऑगस्ट, २०२६
ठिकाण: नवी मुंबई

सही/-
प्रफुल जैन
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन: ०८०००८०८